# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहिर सूचना

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१८/९७५
दिनांक : 25 JAN 2018

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :- या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/ २०१८/८, दि. ०२.०१.२०१८

विषयांकीत जाहिर सुचनेस अनुसरून कळविण्यात येते की, राज्यातील विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या खालील अर्जाची प्राथमिक तपासणी दि. ३१.०१.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता व सुनावणी दि. ०१.०२.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार विद्यमान संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळी ऑन लाईन भरलेल्या खालील अर्जाची माहिती Confirm करुन त्यांनी खालील अर्जाच्या प्राथमिक तपासणीसाठी दि. ३१.०१.२०१८ रोजी व सुनावणीस दि. ०१.०२.२०१८ रोजी उपस्थित रहावे.

१) विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे / सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.
२) विद्यमान संस्थेत अतिरीक्त इंटीग्रेटेड व ड्युअल डिग्री सुरु करणे, पदविका व पदवी संस्थेत NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करणे.
३) विद्यमान संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमाचे रुपांतरण प्रथम पाळीत करणे.
४) विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे व यात्तलट करणे
५) ओसीआय / पीआयओ/ परदेशी नागरीक/आखाती देशातील भारतीय कर्मचा-यांची मुले यांच्यासाठी नव्याने अधिसंख्या जागा सुरू करणे
६) अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी / मुलींसाठी नव्याने जागा ठेवण्यास सुरुवात करणे

विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी त्यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या अर्जाची प्राथमिक तपासणी आणि सुनावणीस येतांना संदर्भीय जाहिर सुचनेतील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद कागदपत्रांचे २ संच (स्पायरल बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), तसेच AICTE यांचेकडे सादर केलेल्या अर्जातील माहितीच्या पुष्ठर्थची दस्तावेज, सन २०१८-१९ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह उपस्थित रहावे. दि. ३१.०१.२०१८ रोजी आयोजित अर्जाच्या तपासणीसाठी माहितीगार संस्थेच्या प्रतिनिधींनी (प्राचार्यांनी प्राधिकृत केल्याच्या प्राधिकारपत्रासह) उपस्थित रहावे, मात्र दि ०१.०२.२०१८ रोजीच्या सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१८/ 260
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का. अमरावती.
दिनांक 25/01/2018

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सबंधित संस्था, यांना यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये नमुद सुचनेप्रमाणे कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:२/एनजीसी/न.प्र.त/२०१८/९४७
दिनांक : 25 JAN 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या
मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :- १) या संचालनालयाने पत्र क्रमांक क्रमांक २/एनजीसी/ मान्यता/२०१८/९,
दि. ०२.०१.२०१८
२) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/
२०१८/८, दि. ०२.०१.२०१८

विषयांकीत प्रकरणी संदर्भ क्रमांक २ च्या जाहिर सुचनेतील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद अर्जाच्या अनुषंगाने आपले स्तरावरुन प्रत्यक्ष तपासणी करुन चौकशी अहवाल सादर करण्यास कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार याबाबत आपल्या कार्यालयामार्फत दि. २९.०१.२०१८ पर्यंत या संचालनालयास ज्या संस्थाचे तपासणी अहवाल सादर करण्यात येतील त्या संस्थाना दि. ०१.०२.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता या संचालनालयातील समिती सभागृहात सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास आपले स्तरावरुन कळविण्यात यावे. सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळवतांना संबंधित संस्थेस अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रतीसह संपुर्ण प्रस्ताव (अर्जात भरलेल्या माहितीच्या पृष्ठ्यर्थ मुळ कागदपत्रे) नोंदणी शुल्क भरल्याची पावतीसह नवीन सुरु होणाऱ्या संस्थाच्या प्रस्तावासाठी संस्थेचे अध्यक्ष / सचिव, तसेच विद्यमान संस्थाच्या प्रस्तावासाठी प्राचार्य यांनी व्यक्तीशः सुनावणीस उपस्थित राहणे अनिवार्य असल्याची बाब सुध्दा कळविण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास अवगत करावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/२०१८/ 261
सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. अमरावती.
दिनांक 25/01/2018

सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्बधित संस्था, यांना यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता
त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये नमुद सुचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.